## सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, तासगांव, जि. सांगली यांचे न्यायालयात

(डॉ.रिटा एस. कुळकर्णी यांचे समोर)

नियमित दिवाणी दावा क्र.१५६/२०२१.
[CNR : MHSN090011142021]

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. महादेव भिमराव पाटील. | **वादी** |
| | *विरुध्द* | |
| १. | सरंपच ग्रामपंचायत, हातनूर वगैरे | **प्रतिवादी** |

### वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०६, नियम १७ अन्वये नि.क्र.४६ वर कैफियत दुरुस्ती अर्जावरील आदेश.

**(०१).** प्रतिवादी यांचे कथन असे आहे की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी त्यांचेविरुध्द निरंतर ताकिदीकरीता व हक्क शाबीतीकरीता केलेला आहे. प्रस्तुत कामी प्रतिवादीने कैफियत दाखल केली असुन त्यामध्ये काही ठिकाणी सि.स.नं. ६५२ ऐवजी ३५२ असा नमुद झालेला आहे. त्यामुळे कैफियतमध्ये ज्या ज्या ठिकाणी सि.सनं. ३५२ असे नमुद झालेले आहे त्या त्या ठिकाणी सि.सनं. ६५२ असे नमुद करणे आवश्यक असल्याने तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेकरीता प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. तसचे प्रतिवादीचे पूढे कथन की, सदरची चुक ही किरकोळ व तांत्रीक स्वरुपाची असल्याने व हस्तदोषामुळे सदरची चुक झालेली आहे. तसेच सदरची चुक दुरुस्त झाल्यास वादी यांचे हक्कावर कोणताही परीणाम होणार नाही. याउलट सदरचा अर्ज नामंजूर झाल्यास प्रतिवादींचेवर अन्याय होणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेस परवानगी मागितली आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज.

**(०२).** वादीतर्फे प्रतिवादीच्या दिनांक २५.०१.२०२३ रोजीच्या निशाणी

क्रमांक ४६ कडील दावा दुरुस्ती अर्जास म्हणणे निशाणी क्रमांक ४८ कडे दाखल करुन वादीचा अर्ज व त्यामधील कथने नाकारली आहेत. वादी यांचे असे कथन आहे की, सदर कैफियत दुरुस्तीमुळे कैफियतीचे संपूर्ण स्वरुप बदलणार आहे. प्रतिवादीने कैफियत देवुन बरेच दिवस झाले असुन अर्जास कारण घडलेले नाही. तरी प्रतिवादीचा दावा दुरुस्ती अर्ज रद्द करण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

**(०३).** दोन्ही बाजूंच्या वकीलांचा युक्तीवाद, अर्जातील कथने, प्रतिवादीचे म्हणणे आणि इतर कागदपत्रे विचारात घेता, प्रस्तुत अर्जाचा निर्णय करणेहेतू माझ्यासमोर खालील वादप्रश्न उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष आणि कारणमिमांसा खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | प्रस्तुत दुरुस्तीमुळे कैफियतीचे मुळ स्वरुप बदलते काय ? | **नाही.** |
| ०२. | उभय पक्षकारांमधील वादाचे गुणदोषावर पुर्णतः निराकरण करणेसाठी प्रस्तुत दुरुस्ती आवश्यक आहे काय ? | **होय.** |
| ०३. | खटल्यांची गुंतागुंत/पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रस्तुत दुरुस्ती आवश्यक आहे काय ? | **होय.** |
| ०४. | काय आदेश ? | **अर्ज मंजुर करणेत आला.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

### <u>वादप्रश्न क्र.०१ बाबतः</u>

**(०४).** वादीच्या कथनानुसार त्यांनी दाव्यास नि.क्र. ३६ कडे म्हणणे व कैफियत दाखल केली असुन त्यामधील परिच्छेद क्र. १२ मधील ओळ क्र. ९ व परिच्छेद क्र. १३ मधील ओळ क्र. १ मध्ये सि.सनं. ६५२ ऐवजी ३५२ असे नमुद झालेले आहे. त्यामुळे सदरचा नंबर दुरुस्त करणे प्रतिवादीस आवश्यक आहे.

कबुल तथ्यानुसार वादीने प्रस्तुतचा दावा हा हक्कशाबीतीसाठी व मनाईसाठी केलेला आहे. सबब प्रतिवादीने मागितलेली दुरूस्ती मंजूर केल्यास कैफियतीचे स्वरूप निश्चितच बदलत नाही. सबब मी वादप्रश्न क्रमांक ०१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**वादप्रश्न क्र.०२ व ०३ बाबतः**

**(०५).** सदरील वादप्रश्न हे परस्परात गुंतले असल्याने तथ्यांची पुनरावृत्ती टाळणे करिता एकत्रीत विचारात घेतले आहेत. कबुल तथ्यानुसार वादी करू इच्छीत असलेली प्रस्तावित दुरूस्ती ही केवळ तांत्रीक स्वरूपाची अशी आहे. सबब, उभय पक्षकारांमधील वादाचे गुणदोषावर पुर्णतः निराकरण करणेसाठी, तसेच खटल्यांची गुंतागुंत/पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रस्तुत दुरुस्ती आवश्यक आहे असे माझे मत आहे. सदरची वस्तुस्थिती विचारात घेता सदर दुरूस्तीमुळे वादींना होणारा संभाव्य त्रास हा द्रव्यदंडाच्या स्वरूपात भरून दिला जावु शकतो असे माझे मत आहे. सबब, वादप्रश्न क्रमांक ०२ व ०३ होकारार्थी उत्तरी करून वादप्रश्न क्रमांक ०४ च्या अनुषंगाने मी खालील प्रमाणे अंतिम आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

(१) अर्ज रक्कम रूपये २००/– च्या भरपाई/खर्चासह मंजुर करणेत आला.

(२) भरपाई/खर्च रक्कम वादी यांना दिलेशिवाय प्रतिवादीस कैफियत दुरूस्ती करता येणार नाही.

(३) पुढील नेमले तारखेपर्यंत प्रतिवादीने मुळ कैफियतीमध्ये दुरूस्ती करून तशा दुरूस्त दाव्याची प्रतही याकामी दाखल करावी.

RITA SHESHRAO KULKARNI
Digitally signed by RITA SHESHRAO KULKARNI
Date: 2023.03.06 17:28:10 +0530

**तासगांव.** (डॉ.आर.एस.कुळकर्णी)

दिनांक : ०६ मार्च २०२३. सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर, **तासगांव.**

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – श्री. अभय अरविंद रणदिवे |
| न्यायालय | – सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जिल्हा सांगली. |
| दिनांक | –०६ मार्च २०२३. |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेली दिनांक | –०६ मार्च २०२३. |
| आदेश अपलोड दिनांक | –०६ मार्च २०२३. |